# नगर परिषद शिक्षण मंडळ

तळेगांव दाभाडे, जि. पुणे - ४१० ५०६.

जावक क्र. : २५१ ते २५२ दिनांक : [illegible]

प्रति,

मुख्याध्यापिका,
माऊंट सेंट ॲन स्कूल,
तळेगांव दाभाडे.

विषय :- मान्य खाजगी प्राथमिक शाळांना नवीन तुकड्या व वर्गांना मान्यता देण्या बाबत सन ९०-९१.

---

मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे- १ यांचे पत्र क्रमांक प्रा/प्राशि/न ा सु/ शैक्षर दिनांक १४/९ /१९९० अन्वये आदेशित केल्या प्रमाणे आपणांस कळविण्यात येते की, आपल्या शाळेस सन १९९०-९१ पासून खालील प्रमाणेच्या ~~मंजुरी~~ नवीन तुकडीस मान्यता देण्यात येत आहे.

| अनु क्र. | शाळेचे नांव | मान्यता द्यावयाची तुकडी नैसर्गिक वाढ. | शेरा |
|---|---|---|---|
| १. | माऊंट सेंट ॲन, तळेगांव दाभाडे. | इयत्ता ७ वी ([illegible]) नैसर्गिक वाढीने | विनाअनुदानीत |

१/- वरील प्रमाणे दिलेली मान्यता शासनाने विहित केलेल्या अटींची पूर्तता (उदा. इमारत, योग्य अर्हता प्राप्त शिक्षकवर्ग, पुरेशी शैक्षणिक साधनसामुग्री, पुरेशी पटसंख्या, सरासरी हजेरी, इत्यादी) पूर्तता करण्याच्या अटीवर देण्यात आलेली आहे.

२/- वरील अटींची पूर्तता होत नसल्यास मान्यता आपोआप रद्द होईल. व पुनः मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करावा लागेल.
कृपया याची नोंद घ्यावी.

प्रत,

१) मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे- १ यांना त्यांचे कडील वरील संदर्भीय पत्रान्वये माहिती साठी सविनय सादर ....

11/1/96

Headmistress
Mount St. Ann Primary School
Telegaon Dabhade
Pune-410 507.

॥ ज्ञानमयो भव ॥

# नगर परिषद शिक्षण मंडळ, तळेगांव दाभाडे

ता. मावळ, जि. पुणे–४१० ५०७.

**आर. डी. मुंगसे**
बी. कॉम. (ऑनर्स) बी. एड.
प्रशासन अधिकारी

जा. क्र. : 539 दिनांक : 6/3/89

प्रति,
मा. मुख्याध्यापिका,
माऊंट सेंट ॲन कॉनव्हेंट स्कुल,
तळेगांव दाभाडे.

विषयः- मान्य खाजगी प्राथमिक शाळांना नवीन तुकड्या उघडण्यांस मान्यता देण्या बाबत. १९८८=८९.

---

मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे पत्र क्रमांक प्रा/प्राशि/जा. तु. पीआर दि. २०/२/१९८९ अन्वये आदेशित केल्या प्रमाणे आपणांस कळविण्यांत येते की, आपल्या शाळेस सन १९८८=८९ पासून खालील प्रमाणे नवीन तुकडीस मान्यता देण्यांस येत आहे.

| अनुक्र. | तुकडी | शेरा. |
|---|---|---|
| (१) | ईयत्ता ५ वी (प्रथम तुकडी) नैसर्गिक वाढीने | विना अनुदानीत |

२/- वरील प्रमाणे दिलेली मान्यता शासनाने विहीत केलेल्या अटींची ( उदा. ईमारत, योग्य अर्हता प्राप्त शिक्षकवर्ग, पुरेशी शैक्षणिक साधनसामुग्री, पुरेशी पटसंख्या व सरासरी हजेरी ई.) पूर्तता करण्याच्या अटीवर देण्यांत आलेली आहे.

३/- वरील अटींची पूर्तता होत नसल्यांस मान्यता आपोआप रद्द होईल व पुनः मान्यतेसाठी फेरप्रस्ताव सादर करावा लागेल याची कृपया नोंद घ्यावी.

Administrative Officer
Municipal School Board, Talegaon Dabha

प्रतः
१) मा. शिक्षण उपसंचालक, पु.वि. पुणे-१ यांना त्यांचे कडील वरील संदर्भीय पत्रान्वये माहिती साठी सविनय सादर.....

जा. क्र. 383 दिनांक 3/10/89
नगरपालिका शिक्षण मंडळ, तळेगांव दाभाडे
जि. पुणे.

प्रति,
मा. मुख्याध्यापिका,
माऊंट सेंट ॲन,
तळेगांव दाभाडे.

विषयः- मान्य खाजगी प्राथमिक शाळांना नवीन /ज्यादा तुकड्या उघडण्यांस मान्यता देण्या बाबत... १९८९=९०.

---

संदर्भः- मा. शिक्षण उप संचालक, पुणे विभाग, पुणे यांचे पत्र जा. क्र. प्रा/प्राशि/जातु/पीआर दि. २७/९/१९८९.

मा. शिक्षण उपसंचालक, पु. वि. पुणे यांचे पत्र क्र. प्रा/प्राशि/जातु/पीआर दि. २७/९/१९८९ अन्वये आदेशित केल्याप्रमाणे आपणांस कळविण्यांत येते की, आपल्या शाळेस खालील नवीन /ज्यादा वर्गास सन १९८९=९० पासून मान्यता देण्यांत येत आहे.

| अनु क्र. | वर्ग | शेरा. |
|---|---|---|
| १) | इयत्ता ६ वी (प्रथमवर्ग) नैसर्गिक वाढीने. | विना अनुदानीत. |

१/- वरील ~~xxxxxxxx~~ नवीन वर्गास मान्यता शासनाने विहीत केलेल्या अटी, उदा. ईमारत, योग्य अर्हता प्राप्त शिक्षक, शैक्षणिक साधन सामुग्री, पुरेशी पटसंख्या व सरासरी हजेरीची अट पूर्ण करण्याच्या अटीवर देण्यांत आलेली आहे.

२/- विहीत अटींची पूर्तता होत नसल्यांस मान्यता आपोआप रद्द होईल व पुनः मान्यतेसाठी फेर प्रस्ताव सादर करावा लागेल. याची कृपया नोंद घ्यावी.

प्रशासन अधिकारी,
न. प. शिक्षण मंडळ, तळेगांव दाभाडे.

प्रतः
१) मा. शिक्षण उप संचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांना त्यांचे वरील संदर्भीय पत्रान्वये माहितीसाठी सादर.....

अत्यंत तातडीचे.

पुणे जिल्हा परिषद, पुणे.
शिक्षण विभाग,
जा.क्र.शिक्षण/प्राथ/२/७३०१८७
पुणे-१, दिनांक १८/८/१९८७

प्रति,

मा. जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,
पुणे.

विषय :- शासकीय परवानगी नसलेल्या खाजगी प्राथ.शाळांची माहिती.

महोदय,

या कार्यालयाने जा.क्र.शिक्षण/प्राथ/२/७२७/८७ अन्वये पुणे जिल्ह्यातील ज्या खाजगी प्राथ.शाळा अनधिकृतपणे चाललेल्या आहेत. त्याची यादी प्रसिध्दीसाठी दिली होती. परंतु शासनाकडील पत्र क्र.शिक्षण व सेवायोजन विभाग, मुंबई यांचेकडील पत्र क्र.व्हीएलएस/१०८७/३२६१/प्राशि/३/८७, दि.२०.७.८७ अन्वये खालील प्राथ.शाळांना मंजूरी दिलेली आहे. तरी खालील प्राथ.शाळांना मंजूरी आली असल्याने सदरच्या शाळा अधिकृत शाळा समजण्यात याव्यात व याबाबत प्रसिध्दी देण्यात विनंती आहे.

| अ.क्र. | शाळेचे नांव | संस्थेचे नांव | माध्यम | इयत्ता |
|---|---|---|---|---|
| १) | माऊन्ट सेंट ॲन कॉन्व्हेंट स्कूल, तळेगांव-दाभाडे. | दि सोसायटी ऑफ सिस्टर्स, मुंबई. | इंग्रजी | १ ते ४ |
| २) | शिवभूमी विद्यालय, यमुनानगर, निगडी. पुणे. | शिवभूमी शिक्षण मंडळ, खेड शिवापूर. | मराठी | १ ते ५ |
| ३) | विकास विद्यामंदीर, विकास तरुण मंडळ, चिंचवड. | विकास तरुण मंडळ, मोहननगर, चिंचवड. | मराठी. | १ ते ३ |
| ४) | जनता शिक्षण संस्था, दापोडी. | पुणे ब्लॉसम इंग्लीश मिडीयम स्कूल. | ~~मराठी~~. इंग्रजी | १ ते २ |
| ५) | वनाज परिवार शिक्षण मंडळ, पुणे. | वनाज परिवार शिक्षण मंडळ, कोथरूड. | मराठी. | १ ते ३ |
| ६) | आचार्य श्री वल्लभ राजस्थानी जैन- विद्या प्रसारक मंडळ, भवानी पेठ, पुणे. | आचार्य श्री वल्लभ राजस्थानी जैन प्रसारक. | इंग्रजी. | १ ली. |
| ७) | डेक्कन एज्यु.सोसा.पुणे. | डेक्कन एज्यु.सोसा. | इंग्रजी. | १ ते ४ |
| ८) | पिपल्स एज्यु.सोसायटी, मुंबई. | पी.ई.एज्यु.स्कूल.येरवडा पुणे. | इंग्रजी. | १ ते २ |

तरी वरील शाळा ह्या अधिकृत शाळा असल्याबाबत प्रसिध्दी द्यावी, ही विनंती.

आपला विश्वासु,

OC signed by

(signature)

प्रत-मा. शिक्षण संचालक, म.रा.पुणे ,पुणे १यांना माहितीसाठी सविनय सादर-

प्रत-मा. शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग,पुणे यांना माहिती साठी सादर

प्रत-शिक्षण प्रमुख,पुणे व चिंचवड महानगरपालिका.

प्रत-संबंधित प्राथमिक शाळा ,माहितीसाठी सादर-

पराच/१८.८.८७

३] संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाचे [ उदा. वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या, विद्यार्थ्यांचे प्रवेश इ. ] काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

४] संस्थेने जवळपासच्या शाळेवर आपल्या शाळेमुळे कोणतेही दुष्परिणाम होणार नाहीत याची दक्षता घेतली पाहिजे.

३] ही परवानगी देण्यापूर्वी संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची खात्री करुन घेऊन मगच त्या संस्थेला खाजगी शाळेची परवानगी देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

१] संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त, अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० या दोन्ही अधिनियमाखाली नोंदली आहे.

२] संस्थेविरुद्ध गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

३] सदर संस्थेने चालविलेल्या प्राथमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारची गैरव्यवहार चालत असल्या बाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५] संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

६] संस्थेने विहीत नमुन्यात सशुल्क अर्ज केला आहे. [ यापूर्वी अर्ज केला नसल्यास तो करुन घ्यावा.

७] शासनाची मंजुरी नसताना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

४] तरी याबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरीत या कार्यालयास पाठवावा.

स्थळ प्रतीवर शि.उ.सं.पु.वि. यांची सही आहे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१ करिता

प्रत :- प्रशासनाधिकारी/महानगरपालिका/ नगरपालिका शिक्षण मंडळ ........ .............. जिल्हा ............... याना माहिती साठी व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

प्रत:- मा. सचिव/ ~~अध्यक्ष~~ ....माऊंट सेन्ट ॲन लक्षगाव-दाभाडे, जि.पुणे. ............................................... याना माहितीसाठी अग्रेषित.

त्वरीत

जा. क्र. प्रा/प्राशि/मान्यता/पीआर
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक 04/AUG. 1987.

प्रति,

शिक्षणाधिकारी
[ प्राथमिक विभाग ]
जिल्हा परिषद पुणे

विषय :- जून १९८७ पूर्वी जुन्या पध्दतीनुसार सुरु असलेल्या अनधिकृत खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत

संदर्भ :- शासनाकडील शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. व्हीएलएस ~~१०८७/(३२८७)प्राशि-३~~ दि. चे पत्र
दि- 20.6.88.

उपरोक्त विषया संबंधीचे आपले कार्यालयास पृष्ठांकितकेलेले शासना-कडील संदर्भित पत्र कृपया अवलोकावे

याबाबत कळविण्यात येते की, खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्याबाबत शासनाने घातलेल्या सर्व साधारण बंदीला अपवाद करुन खाली नमूद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविल्या ठिकाणी व माध्यमातून जून १९८७ पासून प्राथ. शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर विना अनुदान तत्वावर " खास बाब " म्हणून परवानगी देण्यात येत आहे.

| संस्थेचे नाव | शाळेचे नाव व ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|
| मार्कर सेंट ॲन्ज तळेगाव दाभाडे. | मार्कर सेंट ॲन्ज कॉन्व्हेंट स्कूल, तळेगाव-दाभाडे. | १ ते ४ थी. | इंग्रजी. |

१] संस्था सदर शाळा विना अनुदान तत्वावर चालविण्यास आर्थिक दृष्टया सक्षम असली पाहिजे.

२] संस्थेने शाळेसाठी शासनाने विहीत केलेल्या नियमानुसार आणि मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली १९४९ मध्ये विहीत केलेल्या अटीनुसार जागा, शैक्षणिक साहित्य आणि इतर सुविधांची सोय केली पाहिजे. तसेच शाळेसाठी विहीत केलेल्या नियमानुसार विहीत वयोमर्यादित व प्रशिक्षित शिक्षक वर्ग नेमला पाहिजे व त्यांना शासनाने विहीत केलेल्या दराने वेतन व भत्ते दिले पाहिजेत.

महाराष्ट्र शासन

क्रमांक:व्हीएलएस १०८७/(सीआर-३२८१)प्राशि३
शिक्षण व सेवायोजन विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : २ ऑगस्ट ~~जुलै~~, १९८७

प्रति,
मुख्याध्यापक,
माऊंट सेंट ॲन, तळेगांव-दाभाडे,
जि. पुणे - ४१०५०७
जि. पुणे

विषय :- माऊंट सेंट ॲन कॉन्व्हेंट प्राथमिक शाळेस परवानगी मिळण्याबाबत.

महोदय,

वरील विषयासंबंधी लिहिलेल्या पत्रास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेस तळेगांव-दाभाडे या ठिकाणी जून १९८७ पासून इयत्ता १ ते ३री च्या वर्गासहित इंग्रजी माध्यमाची खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबतचे योग्य ते आदेश विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे यांना देण्यात आले आहेत. पुढील कार्यवाहीसाठी आपण कृपया त्यांच्याशी परस्पर संपर्क साधावा.

आपला विश्वासू,

( व. ल. फातरपेकर. )
उपसचिव, महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन - VLS 1087/3261/Pri 3.

प्रथम यादी

क्रमांक:व्हीएलएस १०८७/(३२६१)प्राशि-३
शिक्षण व सेवायोजन विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २० जुलै, १९८७

प्रति,

विभागीय शिक्षण उपसंचालक,

विषय :- जून, १९८७ पूर्वी जुन्या पद्धतीनुसार सुरु असलेल्या अनधिकृत खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत.

जुन्या पद्धतीनुसार शासनाची पूर्व परवानगी न घेता जून १९८७ पूर्वी सुरु असलेल्या खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्याचा प्रश्न कांहीं काळ शासनाच्या विचाराधीन होता. खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्याबाबत शासनाने घातलेल्या सर्वसाधारण बंदीला अपवाद करुन सोबत जोडलेल्या यादीमधील शैक्षणिक संस्थांना, माध्यम प्रत्येक संस्थेसमोर दाखविल्याप्रमाणे, जून १९८७ पासून प्राथमिक शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या अटींवर विना अनुदान तत्वावर "खास बाब" म्हणून परवानगी देण्यात येत आहे.

१) संस्था सदर शाळा विना अनुदान तत्वावर चालविण्यास आर्थिकदृष्टया सक्षम असली पाहिजे.

२) संस्थेने शाळेसाठी शासनाने विहित केलेल्या नियमानुसार आणि मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली, १९४९ मध्ये विहित केलेल्या अटींनुसार, जागा, शैक्षणिक साहित्य आणि इतर सुविधांची सोय केली पाहिजे. तसेच शाळेसाठी विहित केलेल्या नियमानुसार, विहित वयोमर्यादित व प्रशिक्षित शिक्षक वर्ग नेमला पाहिजे. व त्यांना शासनाने विहित केलेल्या दराने वेतन व भत्ते दिले पाहिजेत.

३) संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशांचे (वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या, विद्यार्थ्यांचे प्रवेश इत्यादी) काटेकोरपणे पालन केले पाहिजे.

४) संस्थेने नवख्यासच्या शाळेवर आपल्या शाळेमुळे कोणतेही विपरित परिणाम होणार नाहीत याची दक्षता घेतली पाहिजे.

३. ही परवानगी देण्यापूर्वी प्रत्येक संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची खात्री करुन घेऊन मगच त्या संस्थेला खाजगी शाळेची परवानगी देण्याबाबत कार्यवाही

करण्यात यावी :-

१] संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० या दोन्ही अधिनियमाखाली नोंदली आहे.

२] संस्थेविरूध्द गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

३] सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५] संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

६] संस्थेने विहीत नमुन्यांत सशुल्क अर्ज केला आहे [यापूर्वी अर्ज केला नसल्यास तो करून घ्यावा]

७] शासनाची मंजुरी नसताना प्राथमिक शाळा चालु ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रू. १०० दंड संस्थेने कोषागारांत भरला आहे.

तरी याबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

४. सदर प्राथमिक शाळेला प्रथम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही दिनांक ३१.७.८७ पर्यंत पूर्ण करून त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास दिनांक ७.८.८७ पर्यंत पाठवावा.

[ व. ल. फातरपेकर ]
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१] शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२] शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, शिक्षण मंडळ, तळेगांव-दाभाडे
३] प्रशासन अधिकारी, नगरपालिका
४] मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव.
५] शिक्षण मंत्र्यांचे खाजगी सचिव.
६] शिक्षण राज्यमंत्र्यांचे खाजगी सचिव.
७] निवड फाईल.

जिल्हा - पुणे-

| संस्थेचे /शाळेचे नांव | ठिकाण व तालुका | माध्यम | इयत्ता |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १] पीपल्स एज्यु. सोसा. मुंबई इंग्रजी माध्यम प्रा. शाळा | येरवडा, पुणे-६ | इंग्रजी | १ ते २री |
| २. जनता शिक्षण संस्था पुणे क्लॉसन इंग्लिश मिडीयम स्कूल | दापोडी पुणे-१२ | इंग्रजी | १ ते २री |
| ३] डेक्कन एज्युकेशन सोसायटी पुणे-४ | पुणे-४ | इंग्रजी | १ ते ४थी |
| ४] शिवभूमी शिक्षण संस्था, खेड शिवापूर, शिवभूमी विद्यालय. | यमुनानगर निगडी, पुणे. | मराठी | १ ते ५वी |
| ५] विकास तरुण मंडळ विकास विद्यामंदीर | मोहननगर चिंचवड | मराठी | १ ते ३री |
| ६] सरस्वती शिक्षक संस्था, तळेगाव दाभाडे, सरस्वती, विद्यामंदीर | तळेगांव | मराठी | १ ते ३री |
| ७] माऊंट सेंट ॲन, तळेगांव, दाभाडे माऊंट सेंट ॲन कॉन्व्हेंट स्कूल | तळेगांव दाभाडे | इंग्रजी | १ ते ३री |
| ८] सेंट झेविअर एज्यु. ट्रस्ट, पुणे सेंट झेविअर इंग्लिश मिडियम स्कूल, | चिंचवड | इंग्रजी | १ ते २ री |
| ९] श्री. शिवाजी मराठा सोसायटी पुणे. श्री शिवाजी मराठा प्रा. शाळा | [illegible] पुणे. | मराठी | १ ली |
| १०] आचार्य श्री. विजय वल्लभ [illegible]धानी, जैन विद्या प्रसारक मंडळ, पुणे विजय वल्लभ स्कूल | पुणे | इंग्रजी | १ ली |

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| ११] | वनाज परिवार शिक्षण मंडळ पुणे<br>वनाज परिवार विद्यामंदीर | पौडरस्ता पुणे. | मराठी | १ ते ३ री |
| १२] | पुना वुईमेन्स कौन्सील, पुणे<br>पुना वुईमेन्स प्रा.शाळा | पुणे | इंग्रजी | इ. १ ते ४ थी |
| १३] | ग्रामोन्नती मंडळ, नारायणगांव<br>प्राथमिक शाळा | नारायणगांव | मराठी | १ ली |
| १४] | साने गुरूजी शिक्षण संस्था<br>हडपसर आदर्श विद्यामंदिर | महादेवनगर ता. हवेली | मराठी | १ ली |
| १५] | साने गुरूजी शिक्षण संस्था, हडपसर आदर्श प्राथमिक विद्यामंदीर | ससाणेनगर | मराठी | १ ली |
| १६] | महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ धनकवडी पुणे<br>बालविकास मंदिर | पुणे | मराठी | १ ली ते ३ री |
| १७] | महात्मा फुले विद्या निकेतन, ससाणेनगर, पुणे. | ससाणेनगर पुणे. | मराठी | १ ते ३ री |

| | | | |
|---|---|---|---|
| २]राष्ट्रीय शिक्षण मंडळ, अहमदनगर, राष्ट्रीय पाठशाळा. | अहमदनगर | मराठी | १ ते २ री |
| ३]श्रीरामपूर एज्यु. सोसायटी, श्रीरामपूर. प्रा. शाळा. | श्रीरामपूर | मराठी | १ ली |
| ४]महाराष्ट्र सेवा मंडळ, श्रीरामपूर, प्रा. शाळा. | श्रीरामपूर | मराठी | १ ली |
| ५]अहमदनगर, एज्युकेशन सोसायटी, अहमदनगर, प्रा. शाळा. | अहमदनगर | इंग्रजी | १ ली |

जिल्हा:- सोलापूर

| | | | |
|---|---|---|---|
| १] बृहन्मठ, होटगी श्री वीर तपस्वी प्राथमिक शाळा | एम. आय. डी. सी सोलापूर. | मराठी | १ ते ५वी |
| २]शाहिद टिपू सुलतान. असोसियशन संस्था, सोलापूर. शाहीद टिपू सुलतान उर्दू प्रा. शाळा. | सोलापूर | उर्दू | १ ते २ री |
| ३]अंजुमन नाफेऊल अकलाफ शिक्षण संस्था, सोलापूर, अंजुमन अकलाफ प्राथमिक शाळा. | शेळगी ता. उत्तर सोलापूर | उर्दू | १ ते ३ री |
| ४]आदर्श नाट्य मंडळ, सोलापूर | स्वागतनगर सोलापूर. | मराठी | १ ते २ री |
| ५]सोलापूर शिक्षण प्रसारक मंडळ, प्राथमिक शाळा. | श्रमजीवी नगर नं३ सोलापूर | कन्नड | १ ते २ री |
| ६]विश्वकर्म शिक्षण मंडळ, मैनेश्वर नगर. | नीलम श्रमजीवीनगर सोलापूर. | कन्नड | १ ते २ री |
| ७]शिक्षण प्रसारक मंडळ, कुमठे, प्राथमिक शाळा | कुमठे | मराठी | १ ली |
| ८]श्री. सिध्देश्वर देवस्थान, सोलापूर. | सोलापूर | इंग्रजी | १ ते ४ थी |
| ९]सोलापूर शिक्षण प्रसारक मंडळ, | श्रमजीवी नीलमनगर | कन्नड | १ ते २ री |
| १०]वाय. पी. एज्युकेशन सोसायटी बार्शी, आदर्श मराठी शाळा | बार्शी | मराठी | १ ली |
| ११] भारत शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी, ता. विद्यामंदिर. | बार्शी | मराठी | १ ते ४ थी |

जिल्हा:- रायगड

| | | | |
|---|---|---|---|
| १]कोकण एज्यु. सो. पेझारी शाळा | पेझारी ता. अलिबाग | मराठी | १ ते ४ थी |
| २]दी मेट्रोपॉलिटन एज्यु. सोसायटी बॉन्से स्कूल. | पनवेल | इंग्रजी | १ ते ७ वी |